MAH/MUL/ 03051/2012

ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

**April To June, 2020**
**Issue-34, Vol-02**

Date of Publication
1 April 2020

**Editor**
**Dr. Bapu g. Gholap**
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**विद्येविना मति ेली, मतीविना नीति ेली**
**नीतिविना ाति ेली, ातिविना वित्त ेले**
**वित्तविना शूद्र ाचले, इत` अनर्थ ए ा अविद्येने `ले**

**-महात्मा ज्योतीराव फुले**

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Date of Publication
1 April 2020

# Vidyawarta™

## International Multilingual Research Journal

www. विद्यावार्ता.कॉम
YouTube Channel

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary.*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***

Indexed

IMPACT 6.021 IIJIF FACTOR

Cosmos
IMPACT FACTOR
5.234

Govt. of India,
Trade Marks Registry
Regd. No. 2611690

http://www.printingarea.blogspot.com

13) RURAL DEVELOPMENT AND PANCHAYATI RAJ IN THE ERA OF GLOBALIZATION
**Dr. Anil Kumar Saini, Yamkeshwar (Uttarakhand)** ||58

14) GOALS AND INSTRUMENTS OF MONETARY POLICY IN INDIA
**Dr. Smt. Shalini Saini, Chamoli (Uttarakhand)** ||61

15) A STUDY OF ACADEMIC ACHIEVEMENT OF TRADITIONAL AND SMART ...
**Kumari Mala Yadav, Samastipur, Bihar** ||65

16) पर्यटन, पर्यटक आणि ग्रंथालये : संक्षिप्त आढावा
**श्री. दिलीप गोविंदा पाटील, जिल्हा— रायगड** ||70

17) राष्ट्रीस ए ात्मतेचे दीपस्तंभ : स ा-उत्सव
**प्रा. मोहन बाबुराव चव्हा ा, सोलापूर** ||74

18) आदिवासींच्या वेदनांचा हुंकार:रानआसवांचे तळे
**डॉ. सुर्यप्रकाश जाधव, जि. नांदेड** ||76

19) जा ाति ी र ात बोलींचे महत्व
**प्रा. विनाय ा ापतराव ाळे, मंठा** ||78

20) कुटीर उद्योगामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या नवीन संधी
**कु. पल्लवी एस. खोके & डॉ. के. बी. मोहरीर, चंद्रपूर** ||80

21) स्वराज्य स्थापनेच्या प्र ेत्या माँ साहेब जिजाऊ
**ज्योती शामराव म ार, बीड** ||83

22) अंकीय ग्रंथालय डिजिटल लायब्ररी
**मेस्त्री सागर हेमचंद्र** ||86

23) वार री संप्रदायाचे आजच्या समाजातील महत्व
**सविता यादवराव पाटील, उस्मानाबाद** ||91

24) स्वातंत्र्योत्तर सामाजिक चळवळी आणि मराठी साहित्य
**डॉ. दत्तात्रय वाटमोडे, बुटीबोरी** ||93

25) आदिवासी भिल्ल समाज आणि त्यांची मौखिक गिते
**डॉ. भास्कर गायकवाड, जि. लातूर** ||98

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

16

# पर्यटन, पर्यटक आणि ग्रंथालये : संक्षिप्त आढावा

**श्री. दिलीप गोविंदा पाटील**
ग्रंथपाल,
को.ए.सो. लक्ष्मि शालिनी महिला महाविद्यालय,
पेझारी — अलिबाग, जिल्हा— रायगड

**सारांश :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये आपल्या देशात असलेले सर्व प्रकारची ग्रंथालये, ही पर्यटन केंद्र झाल्यास त्यामुळे होणारे सकारात्मक परिणाम आणि फायदे याचा अभ्यास केला आहे. अतीशय प्राचीन काळापासून आपल्या देशात ग्रंथ आणि ग्रंथालयाला विशेष महत्व आहे. जगात आणि आपल्या देशात जी महान व्यक्तिमत्व आणि थोर विचारवंत, शास्त्रज्ञ, लेखक, अभ्यासक, संशोधक होवून गेले, त्या सर्वांनी ग्रंथ आणि ग्रंथालयाचा आधार आणि उपयोग केल्यामुळेच. सध्याच्या आधुनिक जगात पर्यटनाला विशेष महत्व आहे. देशातील लोक आपल्या कुटुंबासह, मित्रासोबत, दर आठवड्याला, महिन्यातून एकदा किंवा वर्षातून एकदा तरी सहपरिवार, विविध प्रकारच्या पर्यटन स्थळी जातात. अनेक प्रकारच्या शैक्षणिक संस्था, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांसाठी, आणि विविध प्रकारच्या कंपन्या, आपल्या सेवकांसाठी, सहलीचे आयोजन करत असतात. त्यातून त्यांना आनंद मिळतो. परंतु आपल्या देशातील, जी महान ग्रंथालये आहेत त्या ठिकाणाला, जर प्रत्येक कुटुंबाने आणि कुटुंबातल्या सर्व सदस्यांनी, विविध संस्थांच्या कर्मचाऱ्यानी, किंवा शैक्षणिक संस्थांनी, भेट दिली तर त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण होईल आणि ग्रंथालयाप्रती आकर्षण निर्माण होईल. त्यासाठी ग्रंथालये ही पर्यटन केंद्र म्हणून विकसित झाली पाहिजे. या दृष्टीकोनातून प्रस्तुत लेखात संक्षिप्त आढावा घेतलेला आहे.

**प्रस्तावना :—**

आपल्या देशाचा जर इतिहास बघितला तर असे निदर्शनास येते की, प्राचीन काळापासून मानवाचा विविध ठिकाणी प्रवास सुरु असून अनभिज्ञ ठिकाणाचा शोध घेण्याची व आनंद घेण्याची, व नवीन माहिती व ज्ञान मिळविण्याची इच्छा व अपेक्षा मानवी मनास मोहित करत असते. पर्यटनाला जगामध्ये सर्व देशात महत्व आहे. आधुनिक काळात सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध बाबतीत दूरगामी परिणाम करणारी क्रिया म्हणजे पर्यटन होय. प्रवास व पर्यटन हा जागतिक स्तरावर अग्रेसर व्यवसाय असून त्यामुळे लोकांना जास्तीत जास्त रोजगार आणि विविध प्रकारची माहिती व ज्ञान मिळते. प्राचीन काळातील मानव हा अजाणतेपणे प्रवास करीत असे. एकविसाव्या शतकातील मानव हा आवड, कुतूहल, आणि संशोधक म्हणून प्रवास करतो. माहित नसलेल्या स्थळाचा आणि माहितीचा शोध घेणे हे सुज्ञपनाचे लक्षण आहे. असे भारतातील माजी अमेरिकन राजदूत जे. के. गालब्रेथ यांनी मत व्यक्त केलेले आहे. आणि पर्यटनामुळे ते सध्या शक्य होते. विविध देशातील आणि समाजातील लोकांच्या संपर्कामुळे पर्यटनाला चालना मिळते. राष्ट्रीय एकात्मतेस अत्यंत पोषक अशी, वैचारिक देवाण—घेवाण पर्यटनामुळे होते. आंतरराष्ट्रीय सामंज्यस्य वाढविण्यासाठी पर्यटन खूप महत्वाचे आहे. आधुनिक पर्यटन हा शब्द तेराव्या शतकात प्रचलित झाला. याचा अर्थ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करणे आणि मूळ ठिकाणी ठराविक काळात परत येणे असा होतो.

मानवी जीवनात ग्रंथालयाला खूप महत्व आहे. आपल्या कल्पना, भावना, विचार, ज्ञान, अनुभव व्यक्त करणे हा मनुष्याचा स्वभाव आहे. ते इतरांसाठी पोहोचावे यासाठी ज्ञान ग्रंथ बद्ध होवू लागले. प्राचीन काळापासून तर आजपर्यंत मानवाच्या कल्पनाची, अनुभवाची, विचाराची, भावनाची, ग्रंथ ही एक शिदोरी आहे. येणारी प्रत्येक पिढी या शिदोरीचा उपयोग करते, आणि त्यातील जे पचेल, जे रुचेल व मानवेल याचा स्वीकार करते अशी ही बहुमोल संपत्ती आहे. ग्रंथ संपत्ती ही मानवजातीची अखंड सोबतीण आहे. त्यात मानवाच्या संस्कृतीचा इतिहास आहे. ती वापरल्याने तिचा क्षय होत नाही, तर स्वतः अक्षय राहून त्यात आणखी भरच पडत असते. असे हे ग्रंथ भांडार, जेथे वाचकांच्या उपयोगाकरिता ग्रंथ संग्रहित केले जाते सुव्यवस्थित लावले जाते, जतन केले जाते, अशी संस्था उदयास आली, ती संस्था म्हणजे ग्रंथालय होय.अशी ठिकाण पर्यटन केंद्र म्हणून उदयास आली आणि लोकांनी

अश्या स्थळाला भेट दिली तर यामुळे लोकांच्या ज्ञानात भरच पडेल आणि यातून लोकांना वाचनाची आवड निर्माण होवून ग्रंथालायाप्रती आकर्षण निर्माण होईल व स्वता:चा सर्वांगीण विकास करता येईल.

**व्याख्या :—**

**१.पर्यटन :—**

१.१. जोस ऑरिलागा, या विचारवंताच्या मते,

सायकल व अन्य वाहनाने फिरणे, गिर्यारोहण करणे, तळ ठोकणे, नौकाविहार करणे, खेळ इत्यादीसाठी भ्रमण करणे म्हणजे पर्यटन होय.

१.२. प्रा. हुंझीकेर व फ्रंक या विचारवंतांच्या मते,

कायम स्वरूपाची वस्ती न करण्याच्या उद्धेशाने व उत्पादनाशी संबंधित नसलेली व्यक्ती, नवीन माहिती ज्ञान व मनोरंजनाच्या हेतूने भ्रमण करणे म्हणजे पर्यटन होय.

एकंदरीत पर्यटन मानवाचा वैशिष्टपूर्ण व्यायसाय आहे. यामध्ये लोक प्रवास करतात. नेहमीच्या ठिकाणापेक्षा इतर ठिकाणी काही काळ वास्तव्य करतात. वेगवेगळ्या ठिकाणांना भेटी देतात. यामध्ये भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय घटकाचा समावेश होतो. पर्यटक काही कालावधीनंतर आपल्या मूळ ठिकाणी परत येतात. पर्यटन हा एक व्यवसाय असला तरी तो एक सेवा व्यवसाय आहे.

**२.ग्रंथालय:—**

ग्रंथालय हा शब्द 'ग्रंथ+आलय' या दोन शब्दाच्या मिश्रणातून तयार झाला आहे. ग्रंथालय म्हणजे ग्रंथाचे घर असा सर्वसाधारणपणे ग्रंथालयाचा अर्थ समजला जातो. परंतु आधुनिक प्रवाहात ग्रंथालयाचा एवढाच अर्थ मर्यादित राहिलेला नाही, आधुनिक काळाच्या आवश्यकतेनुसार केवळ ग्रंथ संग्रह महत्वाचा नसून त्याचा उपयोग महत्वाचा आहे. म्हणून ग्रंथालयाची परिभाषा पुढीलप्रमाणे करता येईल.

ज्या ठिकाणी संग्रहित ग्रंथाबरोबरच इतर वाचनसाहीत्याचे संकलन केले जाते व ज्या सामुग्रीला वाचण्याकरिता व उपयोग करण्याच्या कार्यासाठी उपयोगात आणले जाते ते ठिकाण म्हणजे ग्रंथालय होय.

**३. पर्यटक :—**

ऑक्सफोर्ड शब्दकोशानुसार,

जो उत्कंठेपायी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी किंवा गमतीजमती साठी व नवीन ज्ञान मिळण्याच्या हुतुने प्रवास करतो त्याला पर्यटक असे म्हणतात.

**पर्यटनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी:—**

प्रवास ही एक प्राचीन अशी गोष्ट आहे. अगदी सुरवातीपासून माणसाला प्रवासाविषयी आकर्षण आहे. सुरवातीच्या काळात प्रवास हा मनात कोणताही उद्धेश किंवा जाणीव न ठेवता आणि साधेपणाने होत असे. प्राचीन काळामध्ये प्रवास करणारे बहुतेक प्रवाशी यात्रेकरू किंवा नवीन प्रदेशाचा शोध घेणारे खलाशी किंवा नवीन प्रदेशाविषयी कुतूहल असणारे किंवा नवीन प्रदेशाचा अभ्यास करणारे शास्त्रज्ञ असेच असत. स्थानिक व दूरच्या प्रदेशाशी होणारा व्यापार हा प्रवासामागील मोठा हेतू होता. व्यापारी लोकांनी मोठ्या संख्येने प्रवास करण्यास सुरुवात केली. व्यापारी संबंधामुळे सांस्कृतिक संबंध निर्माण होवून एकमेकाच्या जीवनाविषयी परिचय झाला व त्यामुळे लोक अधिकाधिक प्रवास करू लागले. मानवी संकृतीचा विकास झाल्यावर जगातील निरनिराळे ज्ञान मिळविण्यासाठी व जग पाहण्यासाठी लोक प्रवास करू लागले .

अठराव्या शतकात प्रवासाचे स्वरूप बदलले आणि प्रवास हा मनोरंजनासाठी होवू लागला जगात रोमन हे मनोरंजनासाठी प्रवास करणारे पहिले प्रवासी होत. त्यानंतर जगात या गोष्टीचा प्रचार झाला. एकोणीसाव्या शतकात झालेल्या रेल्वे मार्गाचा प्रारंभ म्हणजे प्रवासाच्या इतिहासातील महत्वाची घटना मानली जाते. रेल्वे प्रमाणे सागरी वाहतुकीनेही पर्यटनाच्या क्षेत्रात केलेले कार्य महत्वाचे आहे. सागरी वाहतुकीमुळे नवीन जग म्हणून उल्लेख होणाऱ्या अमेरिकेकडे लोकांचा प्रवास होवू लागला. दुसऱ्या महायुद्धा नंतर मोटार प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. त्यामुळे पर्यटन अधिक प्रमाणात होवू लागले. हवाई वाहतुकीच्या विकासानंतर पर्यटनात मोठ्य प्रमाणात वाढ झाली. १९६० नंतर हवाई वाहतुकीत आमुलाग्र प्रगती झाली. त्यामुळे पर्यटनाचा खूपच विकास झाला. अश्याप्रकारे पर्यटनाची पार्श्वभूमी वैशिष्टपूर्ण पहावयास मिळते.

**पर्यटनाची स्वरूप व व्याप्ती:—**

पर्यटन उद्योग हा जगातील महत्वाचा उद्योग आहे. या उद्योगासाठी कोणत्याही प्रकारची यंत्र सामग्री कच्चा माल वगेरे गोष्टी लागत नाही. जगातील हा वाढता उद्योग आहे, याचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक महत्व पाहता जगातील सर्व देशांनी आपापल्या देशात पर्यटनाकडे लक्ष पुरविले आहे. भारतासारख्या विकसनशील देशाच्या दृष्टीने

पर्यटनाला अनन्यसाधारण महत्व आहे. नैसर्गिक सृष्टी सौन्दर्याबरोबर कलाविष्कार व परदेशी स्थळाचा आनंद घेणे या सोबतच ज्ञान मिळविणे ही सध्याची काळाची गरज आहे. गेल्या दशकामध्ये पर्यटनाच्या झालेल्या लोकशाहीकरणामुळे पर्यटकाच्या संख्यात उल्लेखनीय वाढ होत आहे, अलीकडे सामाजिक पर्यटन ही नवीन संकल्पना उदयास येत आहे.

**ग्रंथालयाचे पर्यटनाच्या दृष्टिकोनातून महत्व:—**

'ग्रंथालय' ही एक सामाजिक संस्था आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रंथालयाचे महत्वाचे योगदान आहे. आपल्या देशात ज्ञानदान श्रेष्ठ दान म्हणून समजले जाते आणि या ज्ञानाची पूर्ती ग्रंथालायाद्वारेच पूर्ण होवू शकते. कारण ग्रंथालय अशी एकमेव अशी सामाजिक संस्था आहे की, ती शिक्षित व अशीक्षीत व्यक्तीना समान रूपाने ज्ञान प्रदान करते. विश्वातील सर्वोत्तम विचाराना जाणून घेण्याचा सर्वात सोपा साधा व सरळ मार्ग म्हणजे ग्रंथालय होय. ग्रंथालय हीच अशी एकमेव सामाजिक संस्था आहे की, समाजातील सर्व थरातील लोकाना आयुष्यभर समान रूपाने ज्ञान प्रदान करते. या दृष्टीकोनातून मानवी जीवनात ग्रंथालयाला खूप महत्व आहे.

मानवाच्या अनेक गरजा असतात, त्या गरजाची पूर्ती करण्यासाठी आधुनिक समाजात वेगवेगळ्या सामाजिक संस्थाची स्थपना केली असते. आर्थिक विकास करण्याच्या दृष्टीने आर्थिक साहाय्य संस्था आणि औद्योगिक संस्था स्थापन झाल्या आहेत व अनेक मार्गदर्शन केंद्र स्थापन झाले आहेत. आध्यात्मिक गरज पूर्ण करण्यासाठी धार्मिक केंद्र पर्यटनाची स्थळ आहेत. मनोरंजनात्मक गरज पूर्ण करण्यासाठी सिनेमागृह, दूरदर्शन केंद्र, क्रीडाविषयक संस्था स्थापन झाल्या आहेत. एकंदरीत आधुनिक समाजात मानवाच्या ज्या अनेक गरजा आहेत त्या गरजांची पूर्तता करण्यासाठी अनेक पर्यटन केंद्र स्थापन झाले आहेत, यानुसार प्रत्येक मनुष्य प्रगतीकडे वाटचाल करत असतो.

परंतु ग्रंथालय अशी एकमेव सामाजिक संस्था आहे की, वरील सर्वच क्षेत्रात ग्रंथालयाचे स्थान महत्वपूर्ण आहे वरील सर्व क्षेत्रातील माहिती, ज्ञान ग्रंथालयातून व्यक्तीला प्राप्त होत असते ग्रंथालय अशी एकमेव कार्यक्षम संस्था आहे की, व्यक्तीला सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने समान रूपाने व्यापक ज्ञान व माहिती प्रदान करते आणि व्याक्तीविकासाला हातभार लावत असते. ग्रंथालय अशी एकमेव संस्था आहे की, आधुनिक समाजातील अनेक क्षेत्रातील अनेक भाषातील माहिती व्यक्तीला ज्या भाषेत पाहिजे, त्या भाषेत उपलब्ध करून देते, या दृष्टीकोनोतून आधुनिक समाजात ग्रंथालयाला पर्यटनाचे स्वरूप देणे गरजेचे आहे.

**ग्रंथालय, पर्यटन आणि पर्यटक, फायदे :—**

पर्यटकांनी, कोणत्याही प्रकारच्या ग्रंथालयाला, पर्यटन स्थळ म्हणून भेटी दिल्यास पुढीलप्रमाणे भविष्यात त्याचे फायदे होवू शकतात.

१. कोणत्याही प्रकारचे ग्रंथालय उदा. शैक्षणिक ग्रंथालय, सार्वजनिक ग्रंथालय, विशेष ग्रंथालय, हे ज्ञान देणारे केंद्र आहे. त्यामुळे ज्ञान मिळविण्यासाठी ग्रंथालयाला, पर्यटकांनी अवश्य भेटी दिल्या पाहिजे.

२. पर्यटक या शब्दासोबत ग्रंथालयाचे वाचक म्हणून भविष्यात उदयास येतील.

३. पर्यटकांनी ग्रंथालयाला भेटी दिल्यामुळे, त्यांना विविध प्रकारची माहिती प्राप्त होईल.

४. ग्रंथालयात विविध प्रकारचे ज्ञानसाहीत्यत /वाचनसाहीत्य असल्यामुळे, त्यांच्या सहवासात मोठ्या प्रमाणात मनोरंजन होते.

५. सर्व पर्यटकामध्ये वाचनाची आवड निर्माण होईल.

६. ग्रंथालयाच्या विविध कार्याचा, सेवा—आणि सुविधांचा प्रचार व प्रसार होईल.

७. ग्रंथालय हे एक प्रकारचे संस्कार केंद्र असल्यामुळे पर्यटकावर चांगले संस्कार होतील.

८. ज्ञानी समाज निर्माण होईल.

९. पर्यटकांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळेल.

१०. भारताच्या प्रगतीचा इतिहास, भारताची भौगोलिक माहिती, पर्यटकांना समजेल.

११. पर्यटकांना ग्रंथालयाच्या प्रगतीच्या इतिहासाबद्दल माहिती मिळेल.

१२. पर्यटकांमध्ये प्राचीन काळातल्या वाचनसाहीत्याची उदा. हस्तलिखिते, दुर्मिळ ग्रंथ, विविध विषयावरील संदर्भ ग्रंथ बघायला मिळेल आणि ते वाचण्याची इच्छा निर्माण होईल.

१३. पर्यटकांना विविध भाषेतील नियतकालिके व वर्तमानपत्राचा परिचय होईल.

१४. पर्यटकांना ग्रंथालयाच्या कार्यप्रणाली बाबत माहिती प्राप्त होईल.

१५. ग्रंथालय, हे बदलत्या काळानुसार तंत्रज्ञान युक्त सुविधांनी सज्ज असते त्यामुळे, पर्यटकाला इ—मेल, इंटरनेट, विविध वेबसाईट पाहता येतील आणि माहिती

घेता येईल.

१६. ग्रंथालयाप्रती पर्यटकांमध्ये आकर्षण निर्माण होईल.

१७. पर्यटकांना, मुलांना अभ्यासाची सवय लागेल.

१८. पर्यटक देशाचे जबाबदार नागरिक निर्माण होतील.

१९. देशातील व अन्य देशातील विविध लेखकांचा व त्यांनी लिहिलेले ग्रंथ, बघावयास मिळेल.

२०. पर्यटकांना, लोकशिक्षण, साक्षरता, राजकीय घडामोडी, शेतीविषयक माहिती, तंत्रज्ञान–माहिती, समाजसुधारकांची माहिती, आर्थिक घडामोडीची माहिती, स्पर्धा परीक्षेची माहिती, सर्व प्रकारच्या माहितीचा संग्रहाचा लाभ पर्यटकांना मिळेल.

२१. पर्यटन स्थळ म्हणून, 'ग्रंथालय' पर्यटकांना उपलब्ध होईल.

**उपाययोजना :**

विविध प्रकारचे ग्रंथालय, हे केंद्र आणि राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने सुरु केलेले असते. त्यासाठी पुढील उपाय–योजना अमलांत आणता येतील.

१. केंद्र आणि राज्य शासनाने, शासकीय स्तरावर अंशःता पर्यटन स्थळ म्हणून जाहीर करावे. त्यासाठी नियमावली तयार करावी.

२. केंद्र आणि राज्य शासनाने ग्रंथालय विकसित करण्यासाठी पुरेश्या प्रमाणात निधी उपलब्ध करून द्यावा.

३. पर्यटकांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

४. ग्रंथालयातील वाचनसाहित्य सुरक्षेच्या बाबतीत, ग्रंथालय प्रशासनाने नियमावली तयार करून विशेष काळजी घ्यावी.

५. पर्यटकांना, ग्रंथालयाच्या भेटीसाठी विशिष्ट दिवस ठरवून द्यावे.

६. शैक्षणिक संस्थेच्या सहलींना, वर्षातून एकदा तरी ग्रंथालय स्थळी अनिवार्य करावे.

७. शैक्षणिक ग्रंथालयात, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हा विषय अभ्यासक्रमात शिकविला जावा व हा विषय शिकविण्याची जबाबदारी ग्रंथपालाना देण्यात यावी. यामुळे अतिरिक्त शिक्षक कर्मचारी नेमण्याची गरज भासणार नाही व शासनाची आर्थिक बचत होईल.

८. विविध पर्यटन स्थळी, उदा. सामाजिक पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, ऐतिहासिक पर्यटन, भौगोलिक पर्यटन, धार्मिक पर्यटन, मनोरंजन पर्यटन, तांत्रिक पर्यटन, अ अन्य पर्यटन, इत्यादी ठिकाणी सुसज्ज ग्रंथालये शासनाने स्थापन करावी.

९. केंद्र व राज्य शासनाची सार्वजनिक ग्रंथालये पर्यटकासाठी मोफत उपलब्ध करून द्यावी.

१०. विद्यापीठीय ग्रंथालय सर्व दृष्टीने मोठे असते अशी ग्रंथालये पर्यटकासाठी उपलब्ध करावी.

११. शैक्षणिक संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याना, विद्यार्थी यांना वर्षातून एकदा तरी ग्रंथालय भेट सहल म्हणून अनिवार्य करावी.

**भारतातील राष्ट्रीय ग्रंथालय**

भारतातील राष्ट्रीय ग्रंथालय हे राष्ट्रीय पातळीवरील सार्वजनिक ग्रंथालय आहे. हे ग्रंथालय केंद्र शासनाच्या अंतर्गत काम करते. राष्ट्रातील सर्व नागरिकांना हे ग्रंथालय मुक्तद्वार असते. हे ग्रंथालय राष्ट्रात प्रकाशित होणाऱ्या सर्व ग्रंथाचा संग्रह करते. भारतातील राष्ट्रीय ग्रंथालय कोलकत्ता येथे आहे. १८३५ साली कोलकाता येथील काही व्यासंगी मंडळीनी एकत्र येवून कलकत्ता पब्लिक ग्रंथालय ची स्थापना केली. त्याला १९०३ मध्ये ब्रिटीश शासक यांनी एम्पिरिअल लायब्ररी असे नाव दिले. दिनांक १ फेब्रुवारी १९५३ रोजी केंद्रीय मंत्री अब्दुल कलाम आझाद यांच्या हस्ते ते राष्ट्रास अर्पण करण्यात आले. तेव्हापासून हे ग्रंथालय भारताचे राष्ट्रीय ग्रंथालय आहे.

**निष्कर्ष:**

देशाच्या विकासात आणि साक्षरता प्रसारात, कोणत्याही प्रकारच्या ग्रंथालयाचे फार मोठे योगदान असते. सार्वजनिक रूपाने सर्व नागरिकांना समान रूपाने सेवा–सुविधा पुरविणे हे ग्रंथालयाचे कार्य असते. मनोरंजन व माहिती, ज्ञान देण्यासाठी सार्वजनिक व्यवस्था शिक्षण व साक्षरता प्रसार, समाजातील सर्व स्तरात लोकशिक्षण, रिकाम्या वेळेचा सदुपयोग, माहिती केंद्र म्हणून ग्रंथालये कार्य करते. अशी ठिकाण जर पर्यटन केंद्र म्हणून भारतातील जनतेनी, पर्यटकांनी अशा ठिकाणी भेट दिली तर बौद्धिक विकासासोबतच सर्वांगीण विकास होवून देशात सुजान व जबाबदार नागरिक निर्माण होतील.

**ग्रंथसूची :**

१. घारपुरे, विठ्ठल : पर्यटन भूगोल य पिंपळापुरे प्रकाशन, (२००१), नागपूर.

२. नरगुंदे, रेवती.: ग्रंथालय आणि सामाजिक विकासय युनिव्हर्सल पब्लिकेशन (२०१३), पुणे.

३. जैन, प्रकाश व इतर: सुलभ ग्रंथालय शास्त्रय विश्व प्रकाशन (२००९), नागपूर.

४. पारखी, गंगाधर र. : ग्रंथालयशास्त्र परिचय, युनिव्हर्सल पब्लिकेशन (२००८), पुणे.

५. कोण्णूर, एम. बी. आणि इतर : ग्रंथालय व माहितीशास्त्रकोश (२००८), पुणे.